**सं.फौ.ख.क्रं.९०२/२०२१**

शासन वि. समिर व इतर

**नि.क्रं. २७**

सरकारतर्फे साक्षीदार क्रं.३ ची साक्ष शपथेवर सुरु

| | | |
|---|---|---|
| नाव | – | सुनिल दिलीप खैरे |
| वय | – | ३६ वर्षे, |
| सध्या नेमणुक | – | पोलीस कॉन्स्टेबल, मिरजगाव पोलीस स्टेशन |
| राहणार | – | मिरजगाव, ता. कर्जत, जि. अहमदनगर. |

**सरतपास सहाय्यक सरकारी अभियोक्ता श्री. एन. आर. वाघ यांच्यामार्फत शपथेवर सुरूः–**

दि. १९/०७/२०२१ रोजी मी पोलीस कॉन्स्टेबल या पदावर कर्जत पोलीस स्टेशन येथे कार्यरत होतो. त्यावेळेस मी जनरल डयुटी व तपासपथकात काम करत होतो. त्यादिवशी पोलीस स्टेशन येथे हजर असताना पो.नि. श्री. चंद्रशेखर यादव यांना गुप्त बातमीदारामार्फत बातमी मिळाली की, कर्जत शहरात प्रभात नगरच्या पाठीमागिल बाजुस कत्तलीच्या उद्येशाने काही जनावरे बांधलेली आहेत. त्यांना सकाळपासून चारा–पाणी व खाद्य दिलेले नाही अशी बातमी मिळाल्यामुळे मला स.पो.नि. श्री. सुरेश माने, पो.कॉ. श्री. मनोज लातुरकर व इतर स्टाफ अशांना कॅबिनमध्ये बोलवुन पोलीस निरीक्षक यांनी सदर ठिकाणी जाऊन खात्री करण्यासाठी छापा टाकण्यास सांगितले. त्यानंतर पो.हे.कॉ. श्री. शेख यांनी दोन पंचांना पोलीस स्टेशन येथे बोलवुन घेतले. बातमीतील हकिगत समजावुन सांगितली व ते पंच म्हणुन येण्यास तयार झाली. त्यानंतर आम्ही पंचांसह सरकारी वाहनाने व खाजगी मोटरसायकलने नमुद ठिकाणी जाऊन संध्याकाळी ०६.३० वाजता जाऊन खात्री केली व तेथे आम्ही पाहिले की, चारापाणी न टाकता जनावरांना काटवनात एकुण १० जनावरे बांधलेली दिसली. पो.हे.कॉ. श्री. शेख यांनी त्याचा पंचांसमक्ष पंचनामा केला. असे एकुण १० जनावरे वेगवेगळया रंगाची एकुण किंमत रुपये १,९५,०००/– किमतीची मिळुन आली. त्यानंतर आम्ही सदर जनावरे कोणी बांधली याची चौकशी केली असता सदर जनावरे हे समिर कुरेशी व अस्लम कुरेशी रा. कर्जत, ता. कर्जत यांनी बांधली असल्याची आम्हाला माहिती मिळाली. त्यानंतर पशुधन अधिकारी यांना बोलवून जनावरांची वैद्यकीय तपासणी केली व त्याचे प्रमाणपत्र हस्तगत केले. त्यानंतर सुरक्षेच्या व चारापाण्याची व्यवस्था होण्याच्या दृष्टीने सदरची जनावरे रुक्मीणी गोशाळा, कौडाणे, ता. कर्जत याठिकाणी नेवून सोडले. त्यानंतर मनोज लातुरकर पो.कॉ. यांनी

कर्जत पोलीस स्टेशनला आरोपींविरुध्द फिर्याद दिली. आता मला पंचनामा दाखवला. सदरचा पंचनामा पो.हे.कॉ. श्री. शेख यांनी केला होता. (सदरच्या पंचनाम्यासंदर्भात प्रश्न विचारणे व निशाणी देणेकामी आरोपीचे विधिज्ञ यांनी आक्षेप नोंदवला व युक्तीवाद केला की, सदर साक्षीदाराची सही पंचनाम्यावर नाही. तसेच पंचनाम्यावरील हस्ताक्षरही साक्षीदाराचे नाही. त्यामुळे सदर साक्षीदाराला प्रश्न विचारुन निशाणी देता येणार नाही. सहाय्यक सरकारी अभियोक्ता यांनी असा युक्तीवाद केला की, सदर साक्षीदार पंचनाम्याच्यावेळेस तो हजर असल्याचे सांगतो तसेच पंचनाम्यावरील हस्ताक्षर व सह्या तो ओळखतो. त्यामुळे सदर प्रश्न साक्षीदाराला विचारता येतील. पंचनाम्याच्या दृष्टीने सदर साक्षीदार हा तज्ञ साक्षीदार आहे. म्हणुन प्रश्न विचारता येतील. आदेश– सदर साक्षीदाराने सरतपासात त्याच्या समक्ष पंचनामा झल्याचे कथन केले आहे व पंचनाम्यावरील सही ही श्री. शेख यांची असल्याचे ओळखले आहे. जरी त्याची सही सदर पंचनाम्यावर नसली तरी तज्ञ साक्षीदार म्हणुन किंवा त्याच्या समोर पंचनामा झाला असल्यामुळे व तो सही ओळखत असल्यामुळे पंचनाम्याच्या अनुशंगाने सदर प्रश्न विचारता येतील. ) सदर पंचनाम्यातील मजकर खरा आहे. सदर पंचनामा **नि.क्र.२८** वर आहे. तपासात माझा जबाब घेण्यात आलेला आहे.

**<u>सरतपास पूर्ण.</u>**

**<u>उलटतपास आरोपींतर्फे विधिज्ञ श्री. एन. एस. खरात यांच्यामार्फतः–</u>**

२. छापा टाकल्याच्या ठिकाणाचा गट नंबर, सर्व्हे नंबर मला सांगता येणार नाही. घटनास्थळाची जागा कोणाची होती हे मला सांगता येणार नाही. त्या जागेबद्यल मी चौकशी केली नाही. मी चौकशी का केली नाही याचे कारण मला सांगता येत नाही. पंचनाम्यातील मजकुर मी सांगितलेला नाही. पंचांनी १० जनावरे बांधली असल्याचे सांगितले होते. त्या प्रत्येक जनावरांचे डिटेल वर्णन मला सांगता येणार नाही. पंचांनी काय वर्णन सांगितले होते हे मला आठवत नाही. मी जमलेल्या लोकांकडे चौकशी केली होती, त्या जमलेल्या लोकांची नावे मला सांगता येत नाही. मी तपासी अधिकाऱ्याला चौकशी केल्याचे व जनावरे आरोपींच्या मालकीचे असलेचे सांगितलेले नाही. आजुबाजुला कोणाची घरे होती त्यांची नावे मला सांगता येणार नाही. आजुबाजुला कोणाची घरे होती याची मी चौकशी केली नाही. जागेच्या मालकीबाबत मी चौकशी केली नाही. सरकारे व खाजगी वाहनाने गेलयाबद्यल स्टेशन डायरीला नोंद केली होती त्याचा नोंद क्रमांक मला सांगता येणार नाही. सदरची नोंद किती वाजता केली होती हे मला सांगता येणार नाही. छाटा टाकून गेल्यानंतर पुन्हा स्टेशन डायरीला नोंद केली नाही. हे खरे नाही की,

मी घटनास्थळी गेलो, तेथील जनावरे जप्त केली, घटनास्थळ पंचनामा केला, जप्ती पंचनामा केला हे खोटे सांगत आहे. हे खरे नाही की, १० जनावरे जप्त केल्याचे मी खोटे सांगत आहे. हे खरे नाही की, मी घटनास्थळी गेलो नाही व घटनास्थळाबद्यल मला काही माहिती नाही, त्यामुळे मला घटनास्थळाचा गट नंबर सांगता येत नाही. हे खरे नाही की, जनावरे कोणाच्या मालकीचे आहेत हे देखील मला त्यामुळे सांगता येत नाही. हे खरे नाही की, मी वरीष्ठांच्या सांगण्यावरुन खोटा जबाब देऊन खोटी साक्ष देत आहे. हे खरे नाही की, माझ्या सरतपासणीत मी खोटा जबाब दिला आहे. हे खरे नाही की, आज रोजी मी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पुर्ण.**

**फेरतपास काही नाही.**

स.सा.वा.दा.ब.अ.क.केले.

माझे समक्ष,

RAMRAO BABURAO RAUT

Digitally signed by RAMRAO BABURAO RAUT
Date: 2025.09.20 11:16:21 +0530

(आर. बी. राऊत)

न्यायदंडाधिकारी, प्रथम वर्ग, कर्जत.

दिनांकः २०/०९/२०२५.

(न्यायालय क्र. २)